# UMED - MAHARASHTRA STATE RURAL LIVELIHOODS MISSION
## उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, अमरावती

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
जिल्हा परिषद,
कॅम्प रोड, अमरावती- ४४४६०२
ई-मेल: amravatigoumed.in

District Mission Management Unit
Camp Road-444602
Zilla Parishad,
Email: amravati@umed.in

---

पत्र क्र. जिपअ/मराग्रानीअ/आस्था/ १८०/२०२५-२६ दि. १२/०२/२०२६

प्रती,

----------------------------------

----------------------------------

----------------------------------

विषय:- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यालयीन दैनंदिन काम-काजासाठी झेरॉक्स (प्रिंटर) मशीन (photo copier machine model sharp AR-6031NV) च्या देखभाल दुरुस्ती करिता वार्षिक दरकरार करण्याकरिता दरपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाचे मंजूर प्रशासकीय मान्यता क्र. पत्र क्र./जीपअ/मराग्राजिअ/संपा./वशी-१०२/ २०२५-२६ दिनांक २९/०१/२०२६.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा व तालुका अभियान कक्षात कार्यालयीन दैनंदिन काम-काजासाठी झेरॉक्स (प्रिंटर) मशीन करिता स्प्रेअर पार्ट करीता दर निचित सर्व कारसह दर निश्चित करावयाचे आहे. कार्यालयीन दैनंदिन काम-काजासाठी दैनंदिन काम-काजासाठी झेरॉक्स (प्रिंटर) (photo copier machine model sharp AR-6031NV) मशीनकरिता वार्षिक दरकरार करण्याकरिता खुल्या बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

करीता आपण दैनंदिन काम-काजासाठी झेरॉक्स (प्रिंटर) (photo copier machine model sharp AR-6031NV) मशीनकरिता वार्षिक दरकरार करण्याकरिता दराची सीलबंद दरपत्रक या कार्यालयास दिनांक 23/02/2026 ला दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सादर करावेत. सदर प्राप्त सीलबंद दरपत्रक शक्यतो त्याच दिवशी अथवा दरपत्रक उघडणे बाबत मान्यता प्राप्त करून मा. प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. तथा जिल्हा अभियान सहसंचालक म.रा.ग्रा.जी.अ., अमरावती यांचे कक्षात सायं. ५ वाजता उघडण्यात येईल. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल. दरपत्रकामध्ये दर अपूर्ण असल्यास व दरामध्ये खोडतोड असल्यास सदरची दरपत्रक दर ग्राह्य धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कामाची व्याप्ती :-**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल करार करण्यास्तव नोंदणीकृत पुरवठादार यांचे कडून दरपत्रके मागविण्यात येत आहे. खालीलप्रमाणे साहित्य जिल्हा तथा तालुकास्तरावर उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | जिल्हा / तालुका | साहित्याचा तपशील | नग | खरेदीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष | photo copier machine model sharp AR-6031NV | १ | २०१९ |
| २ | तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, अमरावती, भातकुली, मोर्शी, तिवसा, चांदूर बाजार चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, नांदगाव खं., दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, चिखलदरा, धारणी व वरुड | | | |

उपरोक्त साहित्यासाठी नोंदणीकृत पुरवठादार यांच्या कडून वार्षिक दर करार करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे. पुरवठादाराने यासाठी सर्वसमावेशक आपले दर सादर करावे.

**अ. तांत्रिक लिफाफा:-**

**इच्छुक दरपत्रक धारकांनी खालील तांत्रिक कागदपत्रे सादर केली जाणे आवश्यक आहे.**

क) एकल स्वामित्व फर्म (Proprietary Firm)/ भागीदारी फर्म (Partnership Firm) / मर्यादित कंपनी (Limited Company)/ कायद्याद्वारे स्थापित निर्गमित संस्था (Corporate Body Legally Constituted) असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र

ख) दरपत्रक धारकाकडे PAN कार्ड ची सत्यप्रत सोबत जोडावी

ग) वस्तू व सेवा कर GST नोंदणी प्रमाणपत्र ची सत्यप्रत सोबत जोडावी.

घ) उत्पादकाचे अधिकृत विक्रेते/ वितरक असल्याचे प्रमाणपत्र

**ब. आर्थिक लिफाफा:-**

***खाली दिलेल्या प्रमाणे दर व दस्ताऐवज सादर करावे,**

| अ.क्र. | खरेदीचा तपशील | प्रती नग दर अक्षरी व अंकी |
|---|---|---|
| १. | झेरॉक्स photo copier machine model sharp AR-6031NV मशीन वार्षिक देखभाल साहित्यासह दर. | |

***उपभोग्य साहित्याचे दरपत्रक:-**

| अ.क्र. | विवरण | प्रती नग दर |
|---|---|---|
| १ | टोनर | |

| | | |
|---|---|---|
| २ | ड्रम | |
| ३ | डेव्हलपर | |

*** अटी व शर्ती:-**

१. पुरवठादार यांनी वर्षभरातून ०३ महिने नंतर मशीनची नियमित तपासणी करावी व काही दुरुस्ती असल्यास त्या कराव्या अशा प्रकारे वर्षातून ४ वेळा साहित्याची तपासणी करणे बंधनकारक राहील.

२. तालुक्यातील मशीन हि तालुकास्तरावर बघावी लागणार.

३. जिल्हा स्तरावरील मशीन हि जिल्हास्तरावर बघावी लागेल.

४. उपरोक्त शिवाय साहित्या मध्ये बिघाड झाल्यास सूचना प्राप्त होताच ४८ तासात बिघाड दुरुस्त करून द्यावा लागेल.

५. साहित्या साठी येणारा खर्च पुरवठदारास सोसावा लागेल.

६. उपभोग्य साहित्य असेल तरच त्याचे देयक अदा करण्यात येईल.

७. उपभोग्य साहित्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

८. उपभोग्य साहित्याचे दर पुरवठादाराने दरपत्रकासोबत सादर करावे.

९. पुरवठादारास सर्व साहित्य सुव्यवस्थित ठेवणे बंधनकारक राहील याबाबत कुठलीही तक्रार प्राप्त झाल्यास अथवा विलंब दुरुस्ती झाल्यास रु.५००/- देयकातून कपात करण्यात येईल.

१०. पुरवठादारास ज्याठिकाणी साहित्य उपलब्ध आहे. त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन त्वरित दुरुस्त करावे लागेल या प्रवाससाठी अतिरिक्त रक्कम देण्यात येणार नाही.

११. पुरवठा दारास सदर कामासाठी एक तंत्रज्ञ, १ भ्रमणध्वनी क्रमांक व इ-मेल आयडी उपलब्ध करून द्यावा लागेल. जेणेकरून त्यावर सर्व तक्रारी नोंदविता येतील.

१२. पुरवठादारास सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्यामध्ये दरपत्रक मा. प्रकल्प संचालक, जीग्रावीयं तथा जिल्हा अभियान सहसंचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद परिसर, कॅम्प रोड, अमरावती या पत्यावर सीलबंद पाकीटात सादर करावा लागेल.

Digitally signed by
PREETI BABANRAO DESHMUKH
Date: 11-02-2026 19:06:06

(प्रिती देशमुख)
प्रकल्प संचालक,
जि.ग्रा.वि.यं. तथा
जिल्हा अभियान सहसंचालक,
म.रा.ग्रा.जि.अ., अमरावती

प्रतीलीपी :-

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. तथा जिल्हा अभियान सहसंचालक, मराग्राजीअ, अमरावती यांना माहितीस सविनय सादर.

२. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, मराग्राजीअ, अमरावती यांना माहिती सादर.